(४८९)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/५६४/२०२४
दिनांक : २६/०२/२०२४

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)

## महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश

प्रस्तावना -

वेताळनगर, चिंचवड येथील सि.स.नं.१८६७पै., १८६७/५, १८६७/४८ ते १८६७/६६ व ३११८, ३११८/१ ते३११८/१५, ३११८/१७, ३११८/१८ अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे हे सक्षम आहेत; आणि

ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.१५/१२/२०२३ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दि.१९/१२/२०२३ रोजी डकविण्यात आली असून दि.२६/१२/२०२३ रोजीच्या दैनिक जनमंथन व लोकनायक या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, डिसेंबर २१-२७, २०२३ मध्ये पृष्ठ क्र.१८-१९ वर प्रसिध्द करण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली मिळकत महाराष्ट्र शासन राजपत्र दि.३१/०८/१९९५ नुसार झोपडपट्टी म्हणून घोषित आहे. खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे मालमत्ता पत्रकानुसार एकूण क्षेत्र २५००४.८७ चौ.मी. इतके आहे व त्रिमितीय पद्धतीने केलेल्या परिगणनेनुसार झोपडपट्टी व्याप्त क्षेत्र १४५३०.५२ चौ.मी. इतके आहे, असे उप अभियंता (प्रस्ताव) यांनी दि.०४/१०/२०२३ रोजीच्या अहवालाने स्पष्ट केले आहे. परंतु विधी विभागाकडील अभिप्रायानुसार सि.स.नं.१८६७/१ व १८६७/२ या मिळकतीचे क्षेत्र वगळून ३ (क) करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार अनुक्रमे ८.०१ चौ.मी. व १५.०५ चौ.मी. असे एकूण २३.०६ चौ.मी. क्षेत्र वगळून १४५०७.४६ चौ.मी. एवढे क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

ज्याअर्थी, सदरची आदेशांपूर्वसूचना प्रसिध्द करणेत येवून ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. सदर पूर्वसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. त्यानुसार अद्यापपर्यंत या कार्यालयाकडे सदर बाबत कोणतीही हरकत अथवा लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

ज्याअर्थी, सदर योजनेकरिता वर नमूद मुद्दा क्र. ३ पैकी कमीत कमी क्षेत्र १४५०७.४६ चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीकरिता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश ३(क) अंतिम करणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण १४५०७.४६ चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश :-

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अंतर्गत या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव :- सि.स.नं.१८६७पै., १८६७/५, १८६७/४८ ते १८६७/६६ व ३११८, ३११८/१ ते ३११८/१५, ३११८/१७, ३११८/१८ वेताळनगर, चिंचवड

महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

| गाव- चिंचवड | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| सि.स.नं. | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १८६७पै, १८६७/५, | चिंचवड देवस्थान ट्रस्ट (पिंपरी चिंचवड मनपा करीता संपादीत) | ९६५९.९३ | चिंचवड गाव लागू रस्ता व न.भू.क्र. १८६७ पै, १८६७/१, १८६७/२ | लागू न.भू.क्र. १८६८ पै ते १८७० पै व वाल्हेकरवाडी ते चाफेकर चौक लागू रस्ता | न.भू.क्र. १८७१ पै ते १८७५ पै व १८९२ पै. | न.भू.क्र. १८६७पै, १८९२पै, |
| १८६७/४८ ते १८६७/६६ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | | | | | |
| ३११८ व ३११८/५ | चिंचवड देवस्थान ट्रस्ट (पिंपरी चिंचवड मनपा करीता संपादीत) | ४८४७.५३<br>एकूण १४५०७.४६ चौ.मी | आकुर्डी ते चिंचवड गाव लागू रस्ता | चिंचवड गाव लागू रस्ता | बिजली नगर ते चिंचवड गाव लागू रस्ता | लागू रस्ता |
| ३११८/१ ते ३११८/५, ३११८/७ ते ३११८/१५, ३११८/१७,३११८/१८ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | | | | | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

दिनांक :- / /२०२४

S. R. A. Pune
File No.:- 169/2024
Date :- 22-02-2024

(नीलेश र. गटणे) (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा)- यांसकडे माहितीस्तव.
२. मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सादर.
३. सरपंच, चिंचवड देवस्थान ट्रस्ट, चिंचवड-यांना माहितीस्तव.